दै. सकाळ ६/१/२०२१

# विद्यापीठ बदलणार परीक्षेचा पॅटर्न

## महाविद्यालयाकडे २० गुण, ऑनलाइन-ऑफलाइन परीक्षेसाठी ८० गुण

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥

सोलापूर, ता. ५ : राज्यातील अन्य विद्यापीठांतील विद्यार्थ्यांशी आपल्याही विद्यापीठाचे विद्यार्थी सहजपणे स्पर्धा करु शकतील, नोकरी, व्यवसायात अव्वल राहतील, या हेतूने आता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ परीक्षेचा पॅटर्नच बदलणार आहे. पान ७

### नियोजित बदलासंदर्भातील ठळक बाबी

- वर्णनात्मक प्रश्नांसाठी घेतली जाईल ऑफलाइन परीक्षा; पारंपारिक पॅटर्न बदलणार
- कृत्रिम बुध्दिमत्तेचा वापर करुन विचारले जातील अभ्यासक्रमातील बहुपर्यायी प्रश्न
- २० गुण कॉलेजस्तरावर दिले जातील; प्रत्येकी ४० गुणांच्या होतील ऑनलाइन- ऑफलाइन परीक्षा
- ऑनलाइन परीक्षा घरबसल्याच होईल तर ऑफलाइन परीक्षा विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये घेण्याचे नियोजन
- नव्या पॅटर्नबद्दल प्राचार्यांच्या बैठकीनंतर होईल शिक्कामोर्तब; एक सत्र ऑनलाइन तर एक सत्र ऑफलाइन यादृष्टीनेही नियोजन
- स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीने नव्या पॅटर्नमुळे विद्यार्थ्यांची होईल तयारी; निविदाद्वारे तज्ज्ञांची होईल निवड

## विद्यापीठ बदलणार परीक्षेचा पॅटर्न

» पान १ वरून

त्यानुसार २० गुण महाविद्यालयांकडून दिली जातील, तर प्रत्येकी ४० गुणांच्या दोन परीक्षा, एक ऑफलाइन तर एक ऑनलाइन पध्दतीने परीक्षा घेण्याचे नियोजन सुरु आहे. पारंपारिक पध्दतीने दरवर्षी विद्यार्थ्यांच्या परीक्षा दोन सत्रात घेतल्या जातात. आता कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन परीक्षेचा प्रयोग करण्यात आला. राज्यातील १३ अकृषिक विद्यापीठांच्या तुलनेत सोलापूर विद्यापीठाची परीक्षा सुरळीत पार पडल्याचा दावा विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने केला आहे. आता जळगाव व सोलापूर विद्यापीठ वगळता अन्य कोणत्याही विद्यापीठाच्या सत्र परीक्षा सुरु झालेल्या नाहीत, याचाही आवर्जुन उल्लेख यावेळी परीक्षा नियंत्रक श्रेणिक शहा यांनी केला. सोलापूर विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांचे विद्यार्थी स्पर्धेत टिकून राहावेत, या हेतूने आता परीक्षेचा पॅटर्न बदलण्याचा निर्णय विद्यापीठाच्या विचाराधिन आहे. त्यासाठी शिक्षण व तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांची समिती नियुक्त करुन त्यासंबंधीचा कृती आराखडा तयार केला जाणार आहे. दरम्यान, परीक्षेचा पॅटर्न बदलण्यासंदर्भात विद्यापीठाने तयारी केली असून त्यासंदर्भात अन्य विद्यापीठांमधील तज्ज्ञांशी व महाविद्यालयांमधील प्राचार्यांशी चर्चा करुन अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या परीक्षेत याचा पहिला प्रयोग होऊ शकतो, असेही विद्यापीठातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

CamScanner

# विद्यार्थ्यांना मिळणार २० टक्के रक्कम

## विद्यापीठाने घेतला निर्णय; महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना मिळणार शुल्क

सकाळ वृत्तसेवा

सोलापूर, ता. १७ : कोरोनामुळे प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांची परीक्षा होऊ शकली नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षा शुल्कातील २० टक्के रक्कम परत केली जाणार आहे. महाविद्यालयांच्या माध्यमातून ही रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात वर्ग केली जाणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या या निर्णयाचा सुमारे १८ ते २० हजार विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाशी जिल्ह्यातील १०८ महाविद्यालये संलग्न आहेत. पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी दरवर्षी (प्रथम, द्वितीय व अंतिम वर्षात) सुमारे ७० ते ७५ हजार विद्यार्थी प्रवेशित असतात. कोरोनाच्या संकट काळात या विद्यार्थ्यांची परीक्षा पारंपारिक पध्दतीने घेणे जिकरीचे व अशक्य होते. त्यामुळे अंतिम वर्ष वगळता अन्य विद्यार्थ्यांची परीक्षा न घेताच, त्यांच्या मागील गुणवत्तेवरुन उत्तीर्ण करण्यात आले. या विद्यार्थ्यांची परीक्षा न झाल्याने, त्यांचे परीक्षा शुल्क परत करावे, अशी मागणी विद्यार्थ्यांसह विविध संघटनांनी लावून धरली. त्यानंतर विद्यापीठाने गुणपत्रिकेसह अन्य खर्च कपात करुन सरसकट २० टक्के परीक्षा शुल्क परत करण्याचा निर्णय घेतला. आता त्यानुसार कार्यवाही केली जाणार आहे. दुसरीकडे ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२० मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा फॉर्म भरताना विलंब व अतिविलंब शुल्क भरले आहे, त्यांनाही विलंबाचे शुल्क परत केले जाणार आहे.

> “ विद्यापीठाच्या द्वितीय व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांची परीक्षा रविवारी (ता. २४) सुरु होणार आहे. ऑनलाइन परीक्षा असल्याने सुट्टी दिवशीही परीक्षा होतील. जेणेकरुन आगामी शैक्षणिक वर्ष लवकर सुरु करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळता येईल, हा हेतू आहे. परीक्षा न झालेल्या विद्यार्थ्यांना २० टक्केप्रमाणे शुल्क परत दिले जात आहे.
>
> **- श्रेणिक शहा,**
>
> परीक्षा नियंत्रक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

### ठळक बाबी...

- ज्या विद्यार्थ्यांनी अतिविलंब व विलंब शुल्क दिले, त्यांना परत मिळणार रक्कम
- प्रथम व द्वितीय वर्षात जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले, त्यांनाही मिळणार परीक्षा शुल्कातील २० टक्के रक्कम
- महाविद्यालयांकडे विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती; त्यामुळे रक्कम वर्ग करण्याची जबाबदारी महाविद्यालयांवर सोपविली
- विद्यापीठातील विद्यार्थ्यांना २० टक्के रक्कम संबंधित संकुलातर्फे मिळणार माघारी
- आगामी सत्र परीक्षा ऑनलाईनच; परीक्षा शुल्क कमी करण्याबाबत विद्यापीठाकडून निर्णय नाहीच

CamScanner

# मूल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांवर बडगा

लोकसत्ता 13 सप्टेंबर 2023.


## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे निर्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** नॅक मूल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांवर आता थेट कारवाईचा बडगा उगारण्याचे निर्देश उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले. नॅक मूल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांना नोटीस द्यावी. दिलेल्या कालमर्यादेत प्रक्रिया पूर्ण न केलेल्या महाविद्यालयांचे पुढील काळात नवीन प्रवेश थांबविणे, प्रवेश संख्या कमी, मर्यादित करणे, तसेच त्यांची परीक्षा केंद्रे रद्द करणे अशी कारवाई करण्याबाबत पाटील यांनी स्पष्ट केले.

पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभागीय सहसंचालक यांची आढावा बैठक महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था येथे झाली. त्या वेळी ते बोलत होते. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, विभागीय सह संचालक आदी उपस्थित होते. बैठकीत विद्यापीठनिहाय संलग्न महाविद्यालये, नॅक मूल्यांकन झालेली महाविद्यालये यांचा आढावा घेण्यात आला.

राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने सर्व महाविद्यालयांच्या नॅक मूल्यांकनासाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा. नॅक मूल्यांकनासाठी नोंदणी केलेल्या, मूल्यांकन प्राप्त आणि मूल्यांकन नसलेल्या महाविद्यालयांची माहिती, नावे विद्यापीठांनी संकेतस्थळावर अद्ययावत करून प्रसिद्ध करावी, तंत्रशिक्षण, औषधनिर्माणशास्त्राचे पदविका शिक्षण देणाऱ्या संस्थांनी राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाकडून (एनबीए) मूल्यांकन करून घेणे आवश्यक असून, त्यासाठी तंत्रशिक्षण विभागाने आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही पाटील यांनी दिल्या.




**सद्यस्थिती...**

- अनुदानित महाविद्यालये – १ हजार १७७
- नॅक मूल्यांकन पूर्ण महाविद्यालये – १ हजार ११३
- विनाअनुदानित महाविद्यालये – २ हजार १४१
- नॅक मूल्यांकन असलेली विनाअनुदानित महाविद्यालये – २५७
- एकूण शासकीय महाविद्यालये – २८
- नॅक मूल्यांकन झालेली शासकीय महाविद्यालये – २४
- नॅककडून ए, ए प्लस, ए प्लस प्लस श्रेणीप्राप्त महाविद्यालये – २०२